क्रमांक : ४१३६/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२३.

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन या कार्यालयातील इमारतीत आग लागल्यास किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास अशा प्रसंगी इमारतीत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना संयमाने, शांततेने व कुठल्याही प्रकारे गोंधळ न होता मोकळ्या जागेत आणावे लागते व ही सर्व जबाबदारी अग्निशमन विभागास पार पाडावी लागते. अशा प्रसंगी करावयाच्या उपाययोजनेबाबतचे प्रात्यक्षिक / कवायत (mock drill) गुरुवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

या कवायतीसाठी (mock drill) आवश्यक असणाऱ्या प्रत्येक मजल्यावर १ मार्शल व २ उपमार्शलची कार्य हाताळण्यासाठी सोबत जोडल्याप्रमाणे नेमणूक करण्यात येत आहे. सदरची नियुक्ती ही पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहील.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी अग्निशमन विभागातर्फे आयोजित केलेल्या कवायतीसाठी (mock drill) इमारतीत उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी विधान भवन इमारतीच्या प्रसिमेतील मोकळ्या जागेत येणे अनिवार्य आहे.

**( राजेन्द्र भागवत )**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**सहपत्र :-** सोबत जोडल्याप्रमाणे

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद / मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

४) मा.समिती प्रमुख यांची कार्यालये.

५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी/ कर्मचारी.

७) समादेशक अधिकारी (अग्निशमन), अग्निशमन विभाग, विधान भवन, मुंबई.

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

९) व्यवस्थापक, उपहारगृह, विधान भवन, मुंबई.

१०) सर्व पक्ष कार्यालये.

११) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).

१२) निवडनस्ती.